**नि.फौ. केस क्र.२३९/२०२३**
**निशाणी क्र. २७**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०४ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –

माझे नांव – निर्मला सुनील अंकुशे

वय सुमारे – २८ वर्षे व्यवसाय – घरकाम

निवासस्थान – सैलानी, ता. चिखली, जि. – बुलडाणा

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून</u>**

मी आरोपिंना ओळखते. आज रोजी आरोपी क्र.२ हा हजर आहे. इतर आरोपिंना पाहिल्यास मी ओळखू शकते. फिर्यादी ही माझी आई आहे. घटना ही दि. १५.०६.२०२३ रोजी सैलानी येथे काकाच्या म्हणजे रामचंद्र मुक्कलवार यांचे घरासमोर दुपारी ०३.०० वाजता घडली होती. आरोपीच्या बाथरुमचे पाणी आमच्या घरासमोर येथे होते. त्यामुळे मी आरोपी क्र. १ याला समजावण्याकरीता गेली व त्याला म्हटले की, तुम्ही नाली तयार करा. तुमचे बाथरुमचे पाणी रोज–रोज आमच्या दारात येते. त्यावर आरोपी क्र.१ मला म्हटला की, मी नाली तयार करत नाही, तुला जे करायचे ते करुन घे, असे म्हणून आरोपी क्र.१ याने मला शिविगाळ केली व माझे तोंडावर चापट मारली.

०२. त्यावेळी माझी आई मला सोडविण्यासाठी आली असता आरोपी क्र.१ याने काडीने माझे आईच्या डोक्यावर व डाव्या हातावर मारहाण केली होती. माझे वडील मारहाण पाहून तेथे आले असता आरोपी क्र.२ तेथे आला व त्याने माझे वडीलांना लोटपाट करुन खाली पाडले व ४ ते ५ मुले आणून तुमचे हात पाय तोडू टाकू अशी धमकी दिली. आरोपी क्र.३ व ४ यांनी सुद्धा आईला व मला लाथाबुक्यांनी व चापटा बुक्यांनी मारहाण केली व खाली पाडले.

०३. त्यानंतर आमचे भांडण पाहून बाजुचे दुकानदार किरपानसिंग भोंड व शोभा तायडे तेथे आल्या व आमचे भांडणाची सोडवा–सोडव केली. माझे आईच्या

डोक्यातून रक्त वाहत होते त्यामुळे आम्ही पोलिस स्टेशन येथे रिपोर्ट देण्यासाठी गेलो. त्यानंतर माझे आईला उपचारासाठी पोलिसांनी रायपूर येथील सरकारी दवाखान्यात पाठविले व त्यानंतर बुलडाणा येथे सरकारी दवाखान्यात उपचारासाठी पाठविण्यात आले. त्यानंतर माझे आईने घटनेचा रिपोर्ट दिला. पोलिसांनी माझे बयाण माझे सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. आरोपिंनी ज्या काठीने माझे आईला मारले ती काठी दाखविल्यास मी ओळखु शकते. आरोपीने ज्या काठीने माझे आईला मारहाण केली ही तीच काठी असल्याचे साक्षीदाराने सांगीतले.

सरतपास पूर्ण

**<u>उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. एल.यू सोळंकी यांचे मार्फत</u>**

०४. माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ हे माझे काका आहे व आरोपी क्र.२ हा माझा चुलत भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या पूर्वीपासून आरोपी व माझे वडीलांचे पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सैलानी येथे रोडला लागून टेकडयावर आरोपी क्र.१ याचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याच रोडवर खाली उतारावर माझे वडीलांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे व आमचे घर ज्या ठिकाणी बांधले आहे ती जागा आमचे मालकीची नाही. हे म्हणणे खरे आहे की, पडीत वस्ती असल्यामुळे त्या ठिकाणी कुठलाही रस्ता व नाली तयार झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी माझे व माझे आईचे घर बांधणे सुरु होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ चे लग्न घटनेपूर्वी झाले होते व त्याचे लग्नाला आम्हाला कोणालाही बोलावले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ चे लग्नाला बोलावले नसल्यामुळे आम्हाला त्यांचे बद्दल राग होता.

०५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ याने माझे आईच्या डोक्यात काठीने मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ याने माझे वडीलांना लोटपाट केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी आईच्या घराचे बांधकाम सुरु असतांना घराच्या छतावरील काठी पडून तिचे डोक्यावर मार लागला होता. हे म्हणणे खरे आहे की, बाजारात पाल लावण्यासाठी

काठयांचा वापर केला जातो.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपिंनी मला व माझे आई–वडीलांना कोणत्याही प्रकारची मारहाण केली नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मी माझे आईच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास  नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2026.04.17 17:34:36 +0530

( श्रीमती एस.एच. उके )

दि.१७.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली